लोकमत

महावितरण

## जाहिरात क्र. ०५/२०२३, जाहिरात क्र. ०६/२०२३ व जाहिरात क्र. ०८/२०२३ करीताचे शुध्दीपत्रक

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये सरळसेवा भरती अंतर्गत खालील नमूद पदे भरण्यासाठी दि.२९/१२/२०२३ रोजी कंपनीच्या संकेतस्थळावर जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. तसेच याबाबत विविध वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात आलेली होती.

| अनु.क्र. | जाहिरात क्रमांक | पदाचे नांव |
|---|---|---|
| १ | ०५/२०२३ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) |
| २ | ०६/२०२३ | विद्युत सहाय्यक |
| ३ | ०८/२०२३ | पदविकाधारक शिकाऊ अभियंता (वितरण)/(स्थापत्य) |

उक्त जाहिरातीमध्ये विविध समांतर आरक्षणांसाठी कमाल वयोमर्यादा नमूद करण्यात आली आहे. मा. उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल रिट याचिका क्र. ३४४३/२०२४ या न्यायिक प्रकरणामध्ये मा. न्यायालयाने दि. १९/०४/२०२३ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त समांतर आरक्षणातून अर्ज सादर करण्याकरीता सरसकट विहित कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत करण्यात आली आहे.

यापूर्वी ऑनलाईन अर्ज भरणेकरीताची तारीख २०/०५/२०२४ अशी होती. परंतु वयोमर्यादेमुळे प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त आरक्षणातून अर्ज दाखल करु शकले नाहीत असे उमेदवार व जे उमेदवार विविध कारणास्तव अर्ज भरु शकले नाहीत, अशा सर्व उमेदवारांसाठी ऑनलाईन अर्ज भरणेकरीता दि. २०/०६/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर भरती प्रक्रिया मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र. ३४४३/२०२४ च्या अंतीम निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येईल. अर्ज भरण्याची वेबलिंक (URL Link) कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

**दिनांक : १६/०५/२०२४** **सही/-**

**HOPR NO. १२५/२०२४** **सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं)**